“विधी संघर्षग्रस्त बालकांची गुन्ह्याकडे वळण्याची कारणे आणि परिणाम : एक अभ्यास”

संदर्भः औरंगाबाद जिल्हा (महाराष्ट्र)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठ, नांदेडच्या आंतरविद्याशाखीय विद्याशाखे अंतर्गत

सामज कार्य विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा

शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधन विद्यार्थी

शेख करीम मुनिर

मार्गदर्शक

डॉ. मनिषा मांजरमकर

एम. एस. डब्ल्यु. नेट, पीएच.डी.

जवाहरलाल नेहरू समाज कार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र

सिडको, नांदेड.

मार्च - २०१८

“विधी संघर्षग्रस्त बालकांची गुन्ह्याकडे वळण्याची कारणे आणि परिणाम : एक अभ्यास”

संदर्भः औरंगाबाद जिल्हा (महाराष्ट्र)

प्रस्तावनाः

गुन्हा हा गुन्हाच असतो. समाजबाल्य तथा नितीमत्तेला सोडून आणि बेकायदेशीर केलेल्या वर्तनाला वा कृतीला गुन्हा असे म्हटले जाते. अर्थात गुन्हा करणारी व्यक्ती कशी आहे, ती कोण आहे. स्त्री आहे की पुरुष, तिचे वय काय, तिची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती कशी आहे. या आणि अशा अनेक बाबीवरून गुन्हेगार व्यक्तीचे स्वरूप लक्षात घ्यावे लागते. कारण अनेकदा असेही दिसून येते की, काही गुन्हेगार एकदाच गुन्हा करतात तर काही सदैव गुन्हेगारी जिवन जगत असतात. काहींनी भूरटी चोरी करण्याची सवय असते. काही जण उघडउघड गुन्हे करून पोलीसांचे भक्ष्क बनतात. तर काही जण चोरी व गुन्हा करूनही जगत असतात. म्हणजे गुन्हा कसा आणि कोणता व कोणत्या वयात केला गेला यावरून गुन्हेगारीचे स्वरुप निश्चित होते.

बालगुन्हेगारीचे असेच आहे. बालगुन्हेगार म्हणजे वयात न आलेली व्यक्ती, अर्थात कोणत्या वयापर्यंत बाल समजावे या बाबतीत वेगवेगळ्या देशांचे वेगवेगळे नियम आहेत. आपल्याकडे किमान सोळा वर्षांच्या आतील व्यक्तीला बालगुन्हेगार समजले जाते. लहान मुलाने केलेल्या गुन्ह्याला कायदेशीर शिक्षा देता येत नाही. भावनेच्या भरात लहान मुलाने केलेला गुन्हा, कृत्य त्याच्यासाठी माफ असते. अशा प्रकारच्या गुन्हेगाराला सुधारण्याची संधी दिली जात असते. तरूण गुन्हेगारासारखी बालगुन्हेगाराला कठोर शिक्षा दिली जात नाही. बालगुन्हेगारी ही जगाच्या दृष्टीने एक भयंकर समस्या बनली आहे. दिवसेंदिवस ती अधिक जटील व गंभीर स्वरूपाने वाढत आहे. तरूण वयातील अट्टल गुन्हेगार ही बालगुन्हेगारीतून

जन्माला आलेला असतो. बालवयातच तो प्राथमिक पातळीवरच धडे शिकत असतो. बालगुन्हेगारी हा भारतासाठीच गंभीर प्रश्न बनला आहे, असे नाही तर जगातील सर्व प्रगत नि अप्रगत देशासाठी डोकेदुखी बनली आहे. सर्वच देशात बालगुन्हेगारांचे प्रमाण गंभीर प्रमाणात निर्माण झाले आहे.

विविध देशात किती लहान वयात केलेल्या अपराधांना गुन्हा समजायचे त्याचे वेगवेगळे कायदे आहेत. माणसाचे वय ठरविण्याच्या दोन पद्धती आहेत, एक क्रोनॉलॉजिकल आणि दुसरी बायॉलॉजिकल. मानसिक वय हे व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक क्षमतेवर आधारलेले असते.व्यक्ती ज्या परिस्थितीत आहे आणि तिची मानसिक अवस्था कशी आहे यानुसार व्यक्तीत शारीरीक व मानसिक क्षमतेवर आधारलेले असते. क्रोनॉलॉजिकल म्हणजे जन्मतारखेपासून मोजायची वर्षे, आणि बायॉलॉजिकल म्हणजे व्यक्तीचे मानसिक वय. मानसिक वय हे व्यक्तीच्या शारिरिक बदल झालेले असते. त्यामुळे अनेकदा लहान वयाचा बालक प्रौढ माणसासारखा आणि त्याउलट वयाने मोठा असलेला माणूस लहान मुलासारखा वागत असतो. म्हणून लहान वयात केलेल्या गुन्ह्यासाठी गुन्हेगाराचे शारीरिक वय न घेता त्याचे मानसिक वय विचारात घ्यावे असे जगात अनेक देशांत मानले जाते. गंभीर गुन्ह्यांचा संदर्भात अपराध्याचे मानसिक वयच विचारात घ्यावे असे भारतीय वैद्यक संघटनेचे म्हणणे आहे.

बाल गुन्हेगारी संबंधीत तंज्ञाची मतेः

समाजशास्त्रः

समाजशास्त्र समजतात की वय नाही तर मुलाची वागणूक अपराधाचे कारणे असते.गुंडागर्दी करणे, वाईट लोकांची संगत मिळणे, अश्लील भाषेचा प्रयोग करणे, आईबापांचे न मानणे वगैरे गोष्टी मुलाला अपराधी बनवतात. सामाजिकदृष्ट्या शाळेतून पळून येणे हाही अपराध समजला जातो, परंतु कायद्याच्या दृष्टीने हा अपराध नाही.

मानववंशशास्त्रः

मानववंशशास्त्र आणि शरीर वैज्ञनिक समजतात ही अपराधाची प्रवृत्ती ही आनुवंशिक, मुलाच्या शरीररचनेनुसार आणि त्याच्या जातिधर्मावर अवलंबून असते. एकसारखी शारीरिक रचना असलेले लोक एकसारखेअपराध करतात, आणि गुन्हेगार जातींशी संबंध असलेले पिढ्यानपिढ्या गुन्हेगार असतात. त्यांच्यामध्ये बहूतेक वेळा एकसारखीच अपराधाची प्रवृत्ती असते.

मानसशास्त्रः

मानसशास्त्रज्ञांच्या मते अपराधी प्रवृत्ती वंशावर किंवा शरीरचनेवर अवलंबून नसते. या गोष्टींचे भावना आणि आकांक्षा यांच्याशी काहीही थेट नाते नसते. मूल ज्या वातावरणात वाढते ते वातावरणही गुन्हेगारी प्रवृत्ती असण्याचे कारण नसते. एकाच परिस्थितीत आणि एकाच कुटुंबात वाढलेले सर्व भाऊ-बहीण गुन्हेगार बनत नाहीत.

विधि संघर्षग्रस्त बालकांना गुन्हेगार समजण्याची भारतातील पद्धती :

भारतात सात वर्षे वयापेक्षा कमी वयाच्या मुलाने केलेल्या कृत्याला अपराधच समजले जात नाही. ७ ते १२ वर्षांच्या मुलाला, त्याने केलेल्या कृत्याच्या परिणामांची जाणीव नसते, या कारणाने त्याने केलेल्या अपराधाबद्दल त्याला सजा होत नाही. यानंतर १८ वर्षे वयापर्यंतच्या मुलाला किशोर समजले जाते आणि त्याच्या हातून झालेल्या गुन्ह्यासाठी त्याला बालसुधारगृहात पाठविले जाते. २००० सालापर्यंत यासाठी १६ वर्षे वयाची मर्यादा होती.

विधि संघर्षग्रस्त बालकांची भारतातील स्थिती :

देशात बालगुन्हेगारीमध्ये दरवर्षी वाढ होत आहे. यात मध्य प्रदेश व महाराष्ट्रात सर्वाधिक बालगुन्हेगारीमध्ये सर्वाधिक बालगुन्हेगारांवर गुन्हे दाखल झाले आहेत. त्यात देशात बालगुन्हेगारांना गंभीर गुन्ह्याच्या प्रकारात सर्वाधिक अटक करण्यात आली आहे. यात या बालगुन्हेगारांना बलात्काराच्या विरोधात गुन्ह्यात पकडण्यात आले आहे.

देशातील गुन्हेगारीचा लेखाजोखा मांडणारा 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोचा २०१४' चा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. या अहवालावरुन गेल्या काही वर्षात बालगुन्हेगारीमध्ये वाढ होत असल्याचे स्पष्ट दिसून आले आहे. त्यात बालगुन्हेगारांवर दाखल झालेल्या एकूण गुन्ह्यामध्ये बलात्काराचे गुन्हे सर्वाधिक असल्याचे समोर आले आहे.

देशात २०१२ मध्ये २७ हजार ९३६ बालगुन्हेगारांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. २०१४ मध्ये त्यात वाढ होऊन ३३ हजार ५२६ गुन्हे दाखल झाले आहेत. गेल्या वर्षी बालगुन्हेगारांवर चोरीचे सर्वाधिक ६०८८ गुन्हे दाखल असून महाराष्ट्रातील १२१६ बालगुन्हेगारांचा समावेश आहे. त्यानंतर खून, खुनाचा प्रयत्न करणे, यासारख्या गुन्ह्याचा क्रम लागतो.एकूण गुन्हेगारीत बालगुन्हेगारांचे प्रमाण दीड टक्के असल्याचे समोर आले आहे. देशात बालगुन्हेगारांमध्ये सवात समोर मध्यप्रदेश आहे. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र आहे. तिसऱ्या क्रमांकावर बिहार असून उत्तर प्रदेश चौथ्या क्रमांकावर आहे.

विधि संघर्षग्रस्त बालकांची महाराष्ट्रातील स्थिती :

२०१६ मध्ये ६ हजार २३९ अल्पवयीन मुलांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. २०१५ च्या ५ हजार ४८२ च्या तुलनेत त्यात ७५७ ने वाढ आहे. बाल गुन्हेगारीचे सर्वाधिक प्रमाण मुंबईचे आहे. त्यानंतर सातारा, पुणे, नागपूर शहर, ठाणे शहर, नाशिक शहर यांचा क्रमांक लागतो. बाल गुन्हेगारांमध्यसे १६ ते १८ वयोगटातील मुलांचा सर्वाधिक ७३.६५ टक्के इतका आहे तर १२ ते १६ वर्ष वयोगटातील मुलांचा सहभाग २४.७५ टक्के आहे. बाल गुन्हेगारांमध्ये सर्वाधिक ९७.९४ टक्के मुले हे आपल्या कुटुंबासह राहतात. तर केवळ २.०६ टक्के बालगुन्हेगार निराधार आहेत. २५ हजार ते १ लाख रुपये वार्ष्यिक उत्पन्न असलेल्या गटातील मुले बाल गुन्हेगारीत अधिक असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते.

संशोधन विषयाचे महत्वः

समाजसेवा हे एक व्रत आहे. या व्रताचा अंगिकार केलेल्या प्रत्येक समाजसेवकाला समाजाच्या अंतरंगाचा शोध घ्यावा लागतो. तसा शोध घेता घेताच त्याला अनेक समस्या

सामोऱ्या येतात. सामान्य जनतेला मात्र त्या समस्यांचं गांभीर्य आकलन झालेलं नसतं. या देशात अनेक सामाजिक समस्या आहेत. पण त्यात सर्वात महत्त्वाची समस्या आहे उन्मार्गी मुलांची. पुर्वीच्या काळी मुलांचे समाजातले निश्चित स्थान कोणते, त्याचे महत्व काय, या गोष्टींकडे दुर्लक्ष केलं जात असे. चालू शतकात ही परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. उन्मार्गी मुलांकडे बऱ्याच वेळी उपेक्षेनं पाहिलं जातं. त्याचं कारण या सामाजिक समस्येचे दुष्परिणाम त्या व्यक्तीवर आणि पर्यायाने त्या समाजावर होतात, याची जाणीवच कुणाला नसते. त्यामुळे पुष्कळ मुले त्यांना व्यवस्थित समजून न घेतल्यामुळेच उन्मार्गी होतात, त्यांचा हट्टीपणा वाढतो, त्यांच्यात मानसिक विकृती निर्माण होतात.

उन्मार्गी बालक हेच विधि संघर्षग्रस्त परीस्थिती यांच्यावर येते. पण विधि संघर्षग्रस्त होण्यामागील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक कारणांचेही अध्ययन झाले पाहीजे. शासन करत असलेल्या विविध उपाययोजना यांचेही अध्ययन व्हावे यासाठी प्रस्तुत संशोधन करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादाः

प्रस्तुत संशोधन विषय हा औरंगाबाद जिल्हयापूर्ता मर्यादित असून अभ्यास विषयामध्ये प्रश्नावली भरतांना १८ वर्षाखालील मुलांचा समावेश करण्यात येणार आहे. त्याचबरोबर त्यामुलांच्या पालकांचा सुध्दा समावेश प्रश्नावली भरण्यासाठी करण्यात येणार आहेत. त्याच बरोबर प्रत्यक्ष निरक्षणाद्वारे व अनुसूचि द्वारे माहिती संकलित करण्यात येणार आहेत. अभ्यासासाठी २००१ पासून ते २०१८ पर्यंतचा कालावधी घेण्यात येणार आहेत. ही संशोधनाची प्रमुख मर्यादा आहे.सदर कालावधी मधिलच आथिक, सामाजिक घटकांचा विधी संघर्षग्रस्त बालकांवर होणारा परिणाम अभ्यासला जाणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) विधि संघर्ष ग्रस्त बालकांच्या गुन्हयाकडे वळण्याच्या कारणांचा अभ्यास करणे.

२) विधि संघर्ष ग्रस्त होण्यामागील सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक कारणांचा अभ्यास करणे.

३) विधि संघर्ष ग्रस्त बालकांच्या वैयक्तिक आणि कौटुबिंक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

४) विधि संघर्ष ग्रस्त बालकांच्या गुन्हयामुळे समाजावर होणारा परिणाम अभ्यासणे.

५) विधि संघर्ष ग्रस्त बालकांकरिता राबिविण्यात येणाऱ्या शासनाच्या योजनाचां अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितकेः

१) विधि संघर्षग्रस्त बालकांच्या गुन्ह्याकडे वळण्याची विविध कारणे असू शकतात.

२) आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे मुले गुन्हे प्रवृत्तीकडे वळतात.

३) वैयक्तिक व कौटुंबिक गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले बालक विधी संघर्षग्रस्त होतात.

४) विधी संघर्षग्रस्त बालकांची वयक्तीक व कौटुंबिक पार्श्वभूमी गुन्हेगारी प्रवृत्तीकडे प्रवृत्त होतात.

५) विधि संघर्ष ग्रस्त बालकांवर राबविण्यात येणाऱ्या शासकीय उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम मुलांवर होतो.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधन हे विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक पध्दतीने करण्यात येईल. या संशोधनामध्ये विधी संघर्ष ग्रस्त बालकांच्या गुन्ह्याच्या कारणांचा वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतीने आणि त्याच्या कारणांचा विश्लेषणात्मक पध्दतीने अभ्यास करण्यात येईल. या संशोधनासाठी पुढिल टप्प्यांचा अवलंब केला जाईल.

१) तथ्य संकलन पद्धती :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक आणि द्वितीय साधन सामग्रीचा वापर करण्यात येणार आहे.

अ) प्राथमिक माहिती स्त्रोतः

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक साधन सामग्रीचा वापर करण्यात येणार असून त्यामध्ये प्राथमिक साधनांमध्ये प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची आणि प्रत्यक्ष पाहणी इत्यादीं साधनांचा वापर करण्यात येईल.

ब)द्वितीय माहिती स्त्रोतः

दुय्यम साधन सामग्रीमध्ये पूर्वी संशोधन केलेली संशोधने उदा.पीएच.डी चे प्रबंध, एम.फील चे प्रबंध, शासनाने प्रकाशीत केलेली अहवाल, मासिके, दैनिक वर्तमान पत्रे, शिक्षण मंत्रालयाने प्रकाशित केलेली प्रकाशने तसेच जिल्हा परिषदेने प्रकाशीत केलेली प्रकाशने इत्यादींचा संशोधनासाठी वापर करण्यात येणार आहे.

२) माहितीचे विश्लेषन

प्रस्तुत संशोधनासाठी संकलित केलेल्या माहिती सारणीकरण करून त्याचे योग्य प्रकारे विश्लेषन करण्यात येईल. संकलिक केलेल्या माहितीचे योग्य त्या आलेख, नकाशा आणि कार्टोग्राफीने स्पष्टिकरण करण्यात येईल. संकलिक केलेल्या माहितीचे सांखिकीय पध्दतीने परिक्षण करण्यात येईल.

नमुना निवड पद्धती :

विधी संघर्षग्रस्त बालकांच्या गुन्ह्याकडे वळण्याची कारणे आणि परिणाम : एक समाजशास्त्रीय अभ्यास करण्यासाठी संभाव्यता नमुना मधील साधा यादृच्छिक नमुन्यातील लॉटरी पद्धतीचा अवलंब करण्यात येईल व लॉटरी पद्धतीने अभ्यास क्षेत्रातील १५० विधी संघर्षग्रस्त बालकांची निवड करण्यात येईल.

संशोधन अभ्यासक्षेत्र :

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे औरंगाबाद जिल्हा आहे. विधी संघर्ष ग्रस्त बालकांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक कारणे व शासकीय योजनांचे अध्ययन करण्यासाठी औरंगाबाद जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. ह्या जिल्ह्यामध्ये नोंद असलेले विध संघर्षग्रस्त बालक हे एकक आहेत.

प्रकरण नियोजनः

प्रस्तुत संशोधनाची मांडणी करण्यासाठी संशोधनाचे पाच प्रकरणामध्ये विभागणी करण्यात येईल.

प्रकरण पहिलेःप्रस्तावना, ऐतिहासिक पार्श्वभूमी, साहित्य परिक्षण.

प्रकरण दुसरेः संशोधन आराखडा

प्रकरण तिसरेःसारणीकरण व विश्लेषण.

प्रकरण चौथेःगृहितकृत्यांची पडताळणी व सामान्य निष्कर्ष.

प्रकरण पाचवेः ठळक निष्कर्ष व सुचना शिफारशी.

संदर्भ ग्रंथसूची

मुलाखत अनुसूची

संदर्भ सूचीः

१. लीला अलवारिस, (२००१), मुले व गुन्हेगारी, श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे.

२. व्ही. बी. पाटील, मानवी हक्क, के-सागर पब्लिकेशन, पुणे.

३. डॉ. जयंत व्हटकर, महाराष्ट्रातील गुन्हेगारीः शोध आणि बोध, दिलीपराज प्रकाशन, पुणे.

४. गजानन दुधे, २००७, औरंगाबाद शहरातील बालगृहात प्रवेशित स्थानिक मुलांचा सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास.

५. www.Shodhganga.com

६. www.mahagov.in

७. Maharashtra state databanks.

संशोधन विद्यार्थी — **मार्गदर्शक**

शेख करीम मुनिर

डॉ. मनिषा मंजरामकर
एम.ए.,एम.एस.डब्ल्यु. नेट, पीएच.डी
जवाहरलाल नेहरू समाज कार्य
महाविद्यालय व संशोधन केंद्र,
सिडको, नांदेड